नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा
(र.नं. एफ - १५६२)
द्वारा संचालित

# जिजामाता कला महाविद्यालय

**दारव्हा, जि. यवतमाळ**


दूरध्वनी क्र. (०७२३८) २५५८६२
Email : jkmvd@rediffmail.com | Website : www.jkmvd.org




महाविद्यालयीन वार्षिकांक

# जिजाऊची लेक

२०२३-२४

**अंक एकोणीसावा**

# परंपरा आमच्या यशाची



**कु. सिमा साहेबराव मुधाने**
शिक्षिका
नगर परिषद शाळा नं. २ दारव्हा



**कु. संगिता उगले**
संचालक
सान्वी कोचिंग क्लासेस,अकोला



**कु. शुभांगी उघडे**
रेल्वे विभाग, अमरावती



**कु. सरोज रोडगे**
पोलीस हेडकॉन्स्टेबल
एल.सि.बी. यवतमाळ



**ॲड. रूचिता एम. तुळजापुरे**
ॲडव्होकेट
डिस्टीक्ट ॲड सेसन कोर्ट,अमरावती



**प्रा. अपर्णा माधवराव तुळजापूरे**
स्व. देवराव पाटील ज्यु कॉलेज आर्णी
जि. यवतमाळ



**कु. शितल कराळे**
पोलीस शिपाई
मंगरूळपीर जि. वाशिम



**ॲड. भाग्यश्री वसंतराव सवई**
हायकोर्ट, खंडपीठ नागपूर



**कु. रिता सोळंके**
सिनीअर क्लर्क,
कलेक्टर ऑफीस,अमरावती



**कु. वर्षा तांडेकर**
सिनीअर क्लर्क,
आयटीआय कॉलेज,खामगांव



**कु.सुवर्णा राजेश गोकुळे**
प्राध्यापिका
जि.प. कनिष्ठ महाविद्यालय,लोही



**प्रा. भाग्यश्री सराफ**
प्राध्यापिका
वीर सावरकर क.महाविद्यालय,भुलाई



**सुवर्णा दिवाकर मेश्राम**
महिला पोलीस हेडकॉन्स्टेबल,
यवतमाळ



**कु. शितल ज्ञानेश्वर चौधरी**
वनरक्षक, वाशिम वनविभाग,वाशिम
महाराष्ट्र वनविभाग



**कु. रश्मिता मनवर**
तलाठी, तहसील कार्यालय
पूसद जि. यवतमाळ

नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा (र.नं. एफ-१५६२)

द्वारा संचालित

# जिजामाता कला महाविद्यालय

दारव्हा, जि. यवतमाळ

दूरध्वनी क्र. (०७२३८) २५५८६२

Email : jkmvd@rediffmail.com | Website : www.jkmvd.org



महाविद्यालयीन वार्षिकांक

# जिजाऊची लेक

२०२३-२४

अंक एकोणीसावा

महाविद्यालयीन वार्षिकांक

# जिजाऊची लेक

२०२३-२४

**अंक एकोणीसावा**

प्रकाशक



**डॉ. आश्रू पुंजाजी जाधव**

प्राचार्य

मो. ९८५०८५७५०३

संपादक : वार्षिकांक समिती



**डॉ.प्रा. आर.एस. गेडाम**

ग्रंथपाल

मो. ९५९५९७९१९५



**प्रा. पी.आर. बांडे**

सहा. प्राध्यापक

समाजशास्त्र विभाग



महाविद्यालयीन वार्षिकांक

# जिजाऊची लेक

२०२३-२४

**अंक एकोणीसावा**

**च्या निमित्ताने .....**

महाविद्यालयाच्या शैक्षणिक पूरक उपक्रमातील 'वार्षिकांक' हा युवा विद्यार्थ्यांसाठी आवडीचा व साहित्य गुण सादर करण्याचा हा हक्काचा उपक्रम.

शैक्षणिक सत्र २०२३-२४ या 'जिजाऊची लेक' चा एकोणीसावा अंक आपल्यासमोर ठेवताना मला आनंद होत आहे.

ह्या अंकात मोजकेच परंतु वैविध्यपूर्ण तसेच महत्त्वाच्या विषयांवर आधारलेले लेख, विद्यार्थ्यांच्या साहित्यिक प्रयत्नांतून साकारलेल्या कविता, काही संकलने, चारोळ्या असे साहित्य अंतर्भूत केलेले आहे. त्याचा आपण आनंदाने व अधिक चौकस होऊन स्वीकार करावा.

या वार्षिकांकाला आकार देण्यास महत्त्वाची भूमिका वठविणारे आमचे संपादक मंडळ अभिनंदनास पात्र आहे.

आमचे प्रेरणास्थान, नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.श्री. माणिकरावजी ठाकरे, सचिव श्रीमती माधुरीताई पोले, व्यवस्थापक श्री. अशोकराव ठाकरे, मार्गदर्शक श्री. राहुलभाऊ ठाकरे, श्री. अतुलभाऊ ठाकरे यांचे पाठबळामुळेच आमचे कार्य आम्ही अधिक यशस्वी करू शकलो. तसेच व्याख्यातावर्ग, कर्मचारी वृंद, विद्यार्थी व पालक यांचे सहकार्य तथा मुद्रक, सजावट व मांडणीकार श्री गुरूदेव प्रिन्टर्स, अमरावती यांचे अथक परिश्रम यामुळेच 'जिजाऊची लेक' २०२३-२४ चा , एकोणीसावा अंक सुंदर साकारला गेला आहे.

व्यक्तिशः सर्वांना अभिवादन करून अंक आपल्या सुपुर्द करीत आहो, धन्यवाद !

**डॉ. आश्रू पुंजाजी जाधव**
प्राचार्य
जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा

---

टिप : या अंकातील लेख, ललितबंध, काव्य संग्रहणाशी प्रकाशक व संपादन समिती सहमत असेलच असे नाही.

# अंतरंग

| | | |
|---|---|---|
| १) | बाबा | १ |
| २) | आयुष्य | २ |
| ३) | वडील | ३ |
| ४) | आई | ४ |
| ५) | शेतकरी | ५ |
| ६) | स्त्री जीवन | ६ |
| ७) | शिक्षक | ७ |
| ८) | जमवून बघ | ८ |
| ९) | आयुष्याला द्यावे उत्तर | ९ |
| १०) | पळवाटा | १० |
| ११) | बेटियाँ | ११ |
| १२) | चारोळी | १२ |
| १३) | चारोळी | १३ |
| १४) | जय जिजाऊ | १४ |
| १५) | घोषवाक्य | १५ |
| १६) | सांग न देवा मला मुलगी का बनवलं ? | १६ |
| १७) | सरणावरचा माणूस | १७ |
| १८) | शेतकरी आत्महत्येची गाथा | १८ |
| १९) | माझे माय-बाप | १९ |
| २०) | सत्य कायम टोचतं... | २० |
| २१) | सुविचार | २० |
| २२) | तो आत्महत्येवर मात करी | २१ |
| २३) | बैलगाडी | २१ |
| २४) | शिवाजी राजे | २२ |
| २५) | बाबा... | २२ |
| २६) | नातं लेकीचं... जसा खेळ भातुकलीचा | २३ |
| २७) | जगात भारी १५ फेब्रुवारी | २४ |
| २८) | माझे बाबा | २४ |
| २९) | आयुष्याची परीक्षा... | २५ |
| ३०) | माझे बाबा | २५ |
| ३१) | आई वडील | २५ |
| ३२) | पावसाचे पाणी... | २६ |
| ३३) | माझे गाव | २६ |
| ३४) | नातं तुझे नि माझं... | २७ |
| ३५) | सुविचार | २७ |
| ३६) | सांगू का आई... | २८ |
| ३७) | आई बाबा | २८ |
| ३८) | शिवबा | २९ |
| ३९) | संस्कृती | २९ |
| ४०) | सुविचार | २९ |
| ४१) | एक नाते मैत्रीचे... | ३० |
| ४२) | चारोळी | ३० |

# बाबा

खिसा रिकामा असला तरी
नाही कधी म्हणाले नाही
माझ्या बाबांपेक्षा श्रीमंत
मी कुणी पाहिला नाही

डोळ्यात न दाखवताही
आभाळाएवढं प्रेम करतो
त्याला वडील नावाचा
राजा माणूस बोलतात

लेक जाता सासरी
काळजापासून तो रडत असतो
सुखी ठेवा माझ्या लेकीला
हात जोडून बाप सांगत असतो



कोडकौतुक वेळप्रसंगी
धाकात ठेवी बाबा
शांत प्रेमळ कठोर
रागीट बहुरुपी बाप असतो

काबाडकष्ट करून तो
मातीमध्ये स्वतःचा घाम गाळतो
सुगंधी मखमल फुलांनी तो
मुलाचे भविष्य सजवून देतो

बाबा दणकट बाहू आहेत तुमचे
सांगा कसा वर खाली पडेन
तुम्हीच माझा आधारवड
शेवटपर्यंत मी तुम्हाला जपेन

न बोलता प्रेम करतो
न सांगता आधार देतो
न थकता कष्ट करतो
तो फक्त बाप असतो

कु. गिरिश्वरी जानराव लोखंडे
बी.ए. भाग १

# आयुष्य



आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही
एकाच घरात राहून आम्ही
एकमेकास दिसत नाही...

हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद
एकमेकास दोष देवून
नित्य चाले वादविवाद...

धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही
हृदयाचे पाऊल कधी
हृदयाकडे वळत नाही...


इतकं जगून झालं पण
जगायलाच वेळ नाही
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसला मेळ नाही

क्षण एक येईल असा
घेऊन जाईल हा खास
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास...

अजूनही वेळ आहे
थोडं तरी जगून घ्या
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरून बघून घ्या...

किरण नंदु गोहाडे
बी.ए.भाग १

# वडील



विचार तू, आकार तू
आमचे स्वप्न करी साकार तू...

घराचा तू स्तंभ आणि
आम्हा सर्वांचा आधार तू...

विचारानं सुंदर तू
कर्तृत्वाने पुरंदर तू...

आई जर का देव्हारा
तर घरातलं मंदिर तू...

निर्णयाने खंबीर तू
आम्हास भेटणारा धीर तू...

आई जर असेल मिठाई
तर गोड अशी खीर तू...

मायेचा सागर तू
संस्काराचं घर तू...

काळजी असे आमची नेहमी
आमच्यासाठी तत्पर तू...

आमचा आनंद तू
आनंदाचे कारण तू...

तू घराचं मांगल्य
संयमाचं उदाहरण तू...!

कु. कोमल सुभाषराव लोहकरे
बी.ए. भाग ३

# आई

शिकवणारे जगात खूप असतात
पण, खरी शिक्षण देणारी आई असते
सारेच जण समजावणारे असतात
पण, अश्रू पुसणारी आई असते

पाळणा हलविणारे खूप असतात
पण, अंगाई गाऊन निजरवणारी आई असते
तिच्या सारखी जगी मूर्ती नाही
आई ती, फक्त आईचे असते

पंक्तीत वाढणारे खूप असतात
पण, घास भरवणारी आई असते
बोलणारे खूप असतात जगात
पण, जवळ घेणारी आई असते

पाहणारे खूप असतात मंचावर
पण कौतूक करणारी आई असते
टाळ्या हजारो वाजतात
पण, आशीर्वाद देणारी आई असते



**कु. वैष्णवी शंकर पारधी**
बी.ए. भाग १

# शेतकरी



तळपता सूर्य डोक्यावर घेऊनी
जेवताना कांदा भाकर खाऊनी
तापलेल्या मातीला घामाने भिजवूनी
पिक निर्माण करतो तो शेतकरी...

शरीरात असे काहीतरी
जे शरीरात ऊर्जा निर्माण करी
सगळे त्याला अन्नधान्य म्हणती जरी
ऊर्जा तिच निर्माण करी शेतकरी...

शेतीसाठी हा कर्ज काढी
कर्जासाठी जाई सावकाराच्या दारी
निसर्गही कधी कधी कोपे भारी
धान्याची सर्व नासाडी करी
शासनही अशावेळी मदत न करी
तो म्हणजेच शेतकरी...

कधीतरी मध्येच सरकारला जाग येई
मग एखाद्या पिकाला हमीभाव देई
आश्वासन असे जे कधी पूर्ण न होई
अशामुळेच रोज शेतकऱ्यांचा जीव जाई
असा जीवनग्रस्त तो शेतकरी...

कु. गायत्री अरुण गावंडे
बी.ए. भाग ३

# स्त्री जीवन



कु. मेघा हरिष शेंदुरकर
बी.ए. भाग ३

पणजी म्हणाली आजीला
लेकी, जराशी कळ सोस
उभ्या जल्माचं पांग फिटल
पुढची मागची चिंता मिटल

आजी म्हणाली आईला
पोरी, जराशी कळ सोस
सोन्याच्या घागरीनं पाणी भरशील
राणीवाणी राज करशील

आई म्हणाली मला
चिमणे, जराशी कळ सोस
सुखाचा दरवाजा उघडल
मनाजोगतं सारं घडल

मी म्हणाले लेकिला
लाडके, जरा म्हणून कळ सोसू नको
नसल्या मृगजळात फसू नको
जुनपानं जाळून टाक
वाऱ्यावर उडव राख
लाज सोड, माज कर
दुनियेवर राज कर
उठवल म्हणतील म्हणू दे
शिंदळ म्हणतील म्हणू दे
लाथ मार, पाणी काढ
आडवे येतील तिथेच गाड

शोषित नको
प्रेषित हो

# शिक्षक



ज्ञानाचा प्रकाश देण्या...
दिवा अखंड तो जळतो।

जीवनाचा अर्थ खरा...
शिक्षकामुळेच कळतो।

दिलं आम्हा ज्ञानाचं भांडार...
केलं आम्हाला भविष्यासाठी तयार।

आम्ही आभारी आहोत गुरुचे
ज्यांनी आम्हाला घडवलं आज।

अक्षर-अक्षर शिकवून...
शब्दांचा अर्थ सांगितला।

कधी प्रेमाने तर कधी ओरडून...
जीवनाचा मार्ग दाखवला।

पृथ्वी म्हणते, आकाश म्हणते...
फक्त एकच गाणे...

गुरू तुम्हीच आहात ती साक्षात शक्ती
ज्यामुळे उजळले हे जगणे।

**कु. चेतना राजु जुळे**
बी.ए. भाग १

# जमवून बघ



जन्माला आला आहेस
थोडं जगून बघ

जीवनात दुःख खूप आहे
थोडं सोसून बघ।

चिमुटभर दुःखाने कोसळू नकोस
दुःखाचे पहाड चढून बघ

यशाची चव चाखून बघ
अपयश येतं निरखून बघ

डाव मांडणं सोपं असतं
थोड खेळूनच बघ

घरटं बांधणं सोपं असतं
थोडी मेहनत करून बघ

जगणं कठीण असतं, मरणं सोपं असतं
दोन्हीतल्या वेदना झेलून बघ

जीणं-मरणं एक कोडं असतं
जाता-जाता एवढं सोडवून बघ

**कु. निता केशन राजपल्लू**
बी.ए. भाग ३

# आयुष्याला द्यावे उत्तर

असे जगावे दुनियेमध्ये, आव्हानाचे लावून उत्तर
नजर रोखूनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर

नको गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी ताऱ्यांची
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची...

असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर
नजर रोखूनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर

पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना
हसू असावे ओठांवरती, काळीज काढून देताना



संकटासही ठणकावून सांगावे, आता ये बेहत्तर
नजर रोखूनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर

करून जावे असेही काही, दुनियेतूनी या जाताना
गहिवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवटचा देताना

स्वर कठोर त्या काळाचाही, क्षणभर व्हावा कातर कातर
नजर रोखूनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर

**कु. दिशा मोरेश्वर गौरकार**
बी.ए. भाग ३

# पळवाटा



स्वातंत्र्या तुला शोधून
थकले आमचे डोळे
गुलामीच्या ओझ्याखाली
कसले तुझे सोहळे

स्वातंत्र्या तू कधीच
वस्तीत वळला नाही
म्हणूनच तुझा अर्थ
आम्हाला कळला नाही

गरीब झाले लाचार
श्रीमंतांना आला माज
अत्याचारी माणसांचा
वाढत गेला आवाज

तुझीच वाट पाहून
संपत आले आयुष्य
तुच झाला लाचार
उज्ज्वल कसे भविष्य

तुझ्या तू लोकशाहीच्या
झाल्यात वेगळ्या वाटा
म्हणूनच कायद्याने
शोधल्यात पळवाटा

**कु. मनिषा मारोती राठोड**
बी.ए. भाग २

# बेटियाँ

पापा की परी से जिम्मेदार
बहु बन जाती है बेटियाँ

तेरा मेरा करते करते हमारा
कहना सीख जाती है बेटियाँ

थोडे काम में थकने वाली से
पुरे घर को संभालने वाली हो जाती है बेटियाँ

हर बात पे लडने वाली
आज चुपचाप सुन लेती है बेटियाँ

पापा का हर बात में खर्चे करने वाली
एक एक पैसा जोडने वाली बन जाती है बेटियाँ

सच ही कहा है किसी ने
बेटी से बहु तक बदल जाती है बेटियाँ



**कु. प्रतिक्षा ज्ञानेश्वर खटारे**
बी.ए. भाग १

# चारोळी

शेतकरी एवढा दुःखी असतो
तरी ते जगाला दाखवत नाही

काही जरी पिकत नसलं
तरी तो त्याच्या कुटुंबाला उपाशी
ठेवत नाही

कितीही जरी ऊन असली
तरी तो घरी राहत नाही
काही तरी पिकवल्या शिवाय तो
शांत राहत नाही

**कु. गायत्री अरुण गावंडे**
बी.ए. भाग ३

''चालणारे दोन पाय किती विसंगत
एक मागे असतो एक पुढे असतो
पुढच्याला अभिमान नसतो
मागच्याला अपमान नसतो
कारण त्यांना माहीत असतं
क्षणात सारं बदलणार असतं
याचंच नाव जीवन असतं''

**कु. दिशा मोरेश्वर गौरकार**
बी.ए. भाग ३

''भावनांना कुठे दरवाजा असतो
जिथे मनाचा मेळ होतो
हरिद्वाराचा आनंद
तिथेच निर्माण होतो''

**कु. दिशा मोरेश्वर गौरकार**
बी.ए. भाग ३

## शेतकरी

शेतकरी पावसाची वाट पाहतो
पुढारी खूर्चीची वाट पाहतो
पाऊस नाही पडला तर
शेतकरी रान बदलत नसतो
पुढारी मात्र
खूर्ची नाही मिळाली
म्हणजे पक्ष बदलत असतो

## स्त्रि

स्त्रियों को न देवी मानने की
जरुरत है, और न पुजने की
बल्की स्त्री का
सम्मान करना और बराबरी का
अधिकार देना जरुरी है

**निता राजपल्लू**
बी.ए. भाग ३

# चारोळी

वक्त और टिचर में
थोडा सा फर्क होता है,
टिचर सिखा कर
इम्तिहान लेता है
और वक्त इम्तिहान
लेकर सिखाता है...

## सावित्रीबाई फुले

आओ नमन करे उस सावित्री को
जिसने समाज में शिक्षा की
ज्योत जलाई...
किया खुद को शिक्षित पहले
और बताया फिर समाज को
कितनी जरुरी है
स्त्रियों के लिए पढाई ....

**निता केशव राजपल्लू**
बी.ए. भाग ३

## मैत्रीण

अशी एक मैत्रीण असावी
मनात काहीही न ठेवणारी
दिलखुलास बोलणारी

अशी एक मैत्रीण असावी
बिनधास्त आणि खोडकर असावी
पण मनाने खूप प्रेमळ असावी

अशी एक मैत्रीण असावी
जिला बघूनच असू यावं
आणि तिच्याशी बोलतानाही
सर्व दुःख विसरून जावं!!

**कु. ममता विष्णू कसारदार**
बी.ए. भाग १

किती क्षणाचं आयुष्य असतं
आज असतं तर उद्या नसतं
म्हणूनच हसत हसत जगायचं असतं
जाणारे दिवस जात असतात
येणारे दिवस येतच असतात
जाणाऱ्यांना जपायचं असतं
येणाऱ्यांना बडवायचं असतं आणि
असंच जिवनाचं गणित सोडवायचं असतं

**कु. मनिषा मारोती राठोड**
बी.ए. भाग २



# जय जिजाऊ



''गाजविला प्रताप असा
झुकविली जुलुमशाही
धन्य तु जिजाऊ
त्या शिवबांची आई'' ।।
''स्वराज्याचा जिने घडविला
विधाता, धन्य ती स्वराज्य
जननी जिजामाता'' ।।
।। जय जिजाऊ।।
मुजरा माझा त्या माँ जिजाऊला
घडविला तिने त्या शूर शिवबाला ।।
साक्षात होती ती आई भवानी
जन्म घेतला तिच्या पोटी शिवाजी ।।
मराठी मातीत ज्याने केला गनिमी कावा
तो एकच होता माझ्या जिजाऊचा छावा ।।

**अजय चव्हाण**
बी.ए. भाग २



## घोषवाक्य

- समाजाचा जो आहे रक्षक आहे तो आहे खरा शिक्षक.
- बालमनाला देतो आकार शिक्षक राष्ट्राचा शिल्पकार.
- शिक्षक आरंभ ज्ञानाचा विधाता भावी जीवनाचा.
- गुरू माझी आई गुरू माझे बाबा याहुनी महान आणखी कोण सांगा.
- ज्ञानाचा सागर गुरू शिक्षणाचा नागर गुरू.
- ज्ञानाचा कष्टदाता गुरू प्रत्येकाचा भाग्यविधाता गुरू.
- ज्ञानसुगंध पसरवतो गुरू ज्ञानामृत पाजतो गुरू.
- शिक्षकांचा करा सन्मान जिवनात मिळेल मान.
- शिक्षक आपले गुरू सदैव त्यांना स्मरू.
- माझे ध्येय, माझे स्वप्न माझे प्रेरक, माझे शिक्षक. जीवनामृत पाजतो गुरू
- ज्ञान हाच यशस्वी जीवनाचा पाया आहे.
- पुस्तक वाचा ज्ञान वेचा.
- होशील खरा सज्ञान शाळेमध्ये जावून जर घेशील ज्ञान.
- वाचन म्हणजे प्रगतीचे लक्षण.
- पुस्तकामध्ये असते बुध्दी, पुस्तके वाचुन होईल ज्ञानामध्ये वृध्दी.
- भरपुर मार्क्सने होशील पास तर नीटनेटका करशील अभ्यास.



**प्राची राऊत**
बी.ए. भाग २

# सांग न देवा मला मुलगी का बनवलं ?



कु. राणी जाधव
बी.ए. भाग २

सांग न देवा मला मुलगी का बनवलं.
बिना बुडाचं खेळणे बनवलं
दिल अमुल्य सौंदर्य पण कावळ्याची मात्र शिकार
बनवलं
सांग ना देवा मला मुलगी का बनवलं
सुवासिनीचा मान दिला सासरचा वान दिला
स्वाभिमानच तेवढ खेळणं बनवलं
सांगन देवा मला मुलगी का बनवलं
सगळ्याची आवड मी, सगळ्याची सवड मी
माझ्या स्वप्नांना मात्र दार बनवलं
सांग न देवा मला मुलगी का बनवलं.
मातृत्वाचं वरदान दिलं संसाराचे धनवान दिलं.
पण तरीही ताटाखालच बनवलं
सांग न देवा मला मुलगी का बनवलं
वासल्याची छाया दिली प्रेमाची माया दिली
अभिमानाची मात्र पायातली चाळ बनविलं
सांग न देवा मला मुलगी का बनवल
लक्ष्मी स्थान दिल, घर सांभाळ्याचं
ज्ञान दिलं
पण जगण्यासाठी काटेरी रान बनवलं
सांग न देवा मला मुलगी का बनवलं
कुणाचं तरी स्वप्न बनवलं
अमुल्यअशं रत्न बनवलं
माणसाची ढाल बनवलं
माझ्या अस्तित्वाला शून्य मोल बनवलं
सांग न देवा मला मुलगी का बनवलं ।।

# सरणावरचा माणूस


एका मेलेल्या माणसाने किती छान म्हंटलय.....
सजवत होते मला, मी शांत निजलो होतो,
बहुतेक अश्रुंच्या धारांनी मी चिंब भिजलो होतो.....
शेवटची आंघोळ ती होती गरम पाण्याची,
ज्याला त्याला घाई मला डोळे भरून पाहण्याची...
ज्यांच्या खांद्यावर माझं गेलं होतं बालपण,
शेवटी त्यांनीच मला उचलून घेतलं आजपण
जवळचे सगळे होते, होतं कुणीतरी परकं,
नेऊ नका, मोठ्याने म्हणत होते सारखं....
आज वेगळच काही तरी घडत होतं,
वैऱ्यांचेही प्रेम माझ्यावर पडत होतं....
तिथपर्यंत नेऊन सुध्दा माझ्यावर प्रेम लुटवत होते,
जोरजोरात रडून सगळे मला उठवत होते...
अजून चार लाकड द्यां म्हणजे त्यात भागेल,
माझ्याच कोणीतरी विचारलं अजून किती वेळ लागेल.....
सरणावर झोपून मी मौन पाळलं होतं,
जीव लावणाऱ्या माझ्यांनीच मला जाळलं होतं.....

**कु. राणी घोडे**
बी.ए. भाग ३



# शेतकरी आत्महत्येची गाथा






शेतकरी आत्महत्येची गाथा
अवघ्या महाराष्ट्राची शान
संपूर्ण भारताचा मान
डोळ्यात दुःख वारंवार
आता मन हालवले फार
सर्व जनता शेतकऱ्यांच्या
आत्महत्येनं हादरली
दुःखाचे माप सरता सरेना
पण हे  सर्व पाहताना
माणुसकिच साथ देईना
जीवनाच्या कठीण प्रसंगाना
लढताना कुणी साथ देत नाही
शेतकऱ्यांचे हाल पाहून
सरकारला जाग येत नाही
गेले कूठे शेतकरी
पण आज शेतकऱ्यांना
किंमत नाही जरी
जगाला दावली वाढ कृषीराजानं
माणुसकी मारली माणसानं
रूजली धरणीमाय कृषीराजाला
आता पण आली नाही जाग देवाला
गरिबीची परिस्थिती दावली
आमच्या माथ्याला.
किती वाचावी या समस्येंची पोथी
कुणाला सांगु ही व्यथा
कोणाकडे वाचावी ही आत्महत्येची गाथा....

**कु. राखी इंगळे**
बी.ए. भाग ३

# माये माय-बाप





नजरे नजरेचा अनोखा खेळ
कुणाला प्रेयसी तर कुणाला प्रियकर दिसतो....।
पण माये जवाबी वर होतात डोये तवा मले
अनवानी पायाने वावरात राबणारा माया बाप दिसतो...।
तुह्या माया माय बापा न लय सोसले कष्ट
आपण अडाणी रायलो पण पोरगं पोरगी शिकले पाहिजे
म्हणे मनून तुले मले शहरात धाडलं ह ोतं.....
माया बाप अडाणी होता
पण माया बापानं मले कॉलेजात घातलं,
कॉलेजला जाण्यापर्यंत चा प्रवास काय सांगू
त्या साठी माया माय नं तिचं मंगळसूत्र मोडलं होतं...
जेव्हा माय मायचे आठवते दिवस
मन येते भरून अन् डोये होते ओले ......
माय माई फाटलेली साडी छाकून नेसायची
पण या गरिबीत बी परिसारखं वाढवलं मले...।
संसाराचा गाढा चालवण्यासाठी
माय संग बाप बी रात दिवस कष्टपेलत होता...
अहो कर्माचं फळ नाही तर माया बाप माया ईच्छा
पूर्ण करण्यासाठी त्याच आयुष्य व्यर्थ घालत होता...
दिवस उगवल्या पासून तर रात होईपर्यंतचा
प्रत्येक क्षण माये माय बाप माया साठी जगत असते...
मनून असशील दगडात देव तर माफ करजो पण
मले माया काळ्या माय बापातच विठ्ठल रखुमाई दिसते...

**शुभम नांदेडकर**
बी.ए. भाग २

# सत्य कायम टोचतं ...

नोकरी म्हणजे ८ तासाचा धंदा...
आणि धंदा म्हणजे २४ तासांची नोकरी...!!
''खरं, तर सगळे कागद सारखेच...
पण, त्याला अहंकार चिकटला,
की त्याचं सर्टिफीकेट होतं.
पैसा हा खतासारखा आहे . तो साचवला,
की कुजत जातो ... आणि गुंतवला, तर
वाढायला मदत करतो...!!
लहानपणी मुलांना कार आणि मुलिंना
बाहुली पाहीजे असते ...
आणि मोठेपणी
मुलिंना कार वाला नवरा...
आणि मुलांना बाहुली सारखी
मुलगी हवी असते....!!
लहाणपणी चिल्लर पैसे असले,
की आपण चॉकलेट खायचो...
पण, आता चिल्लरसाठी
चॉकलेट खावं लागतं.....!!
आईच्या पदरात झोपण्याचा आनंद
पुढची पिढी घेऊ शकत नाही....
कारण, जिन्स घातलेली आई
पदर देऊ शकत नाही
सत्य कायम टोचतं,
कारण, त्यामध्ये
पॉईट असतो...!!!

**राहुल उफाडे**
बी. ए. भाग २

## सुविचार

एवढ्या लवकर जगातली
कोणतीच गोष्टबदलत नाही...
जेवढ्या लवकर माणसाची
वृत्ती आणी दृष्टी बदलते....

**कु. नेहा जाधव**
बी. ए. भाग २

नात्यांना मधुर आवाजाची आणि
सुंदर चेहऱ्याची गरज नसते,
गरज असते ती फक्त सुंदर मनाची
अटूट विश्वासाची.

**कु. साक्षी देशकरी**
बी.ए. भाग ३

# तो आत्महत्येवर मात करी



बाप माझा शेतकरी
तो आत्महत्येवर मात करी
म्हणते आत्महत्या करून काही मिळत नाही.
आपला परिवार कर्जात डुबलेला निघत नाही.
माझा बाप आहे  जगाचा पोशिंदा
दुसरा करत नाही तो धंदा
बाप माझा खाते चटणी भाकरी
तो आत्महत्येवर मात करी
त्याला भेटत नाही कोणताही पगार
कर्ज माफ करत नाही सरकार
त्याच्या डोक्यावर आहे  परिवाराचं वजं लय भारी
तो आत्महत्येवर मात करी
माय देते शेतात बापाला साथ
दोघं मिळून करतात दुःखावर मात
त्याच्या हाती आहे  परिवाराची दोरी
तो आत्महत्येवर मात करी
बाप माझा शेतकरी
तो आत्महत्येवर मात करी...

**प्रेम मनवर**
बी. ए.  भाग १

# बैलगाडी

नाही करत ती दुषित हवा,
आवडत नाही तिला वाहनांचा धुवा.
नेहमी असते ती फ्रेश,
पुढे जाऊन घेते मधातच ब्रेक.
नाही लागत तिला इंधन,
नसते बैलगाडीला कशाचे बंधन.



**कु. दिक्षा आवारे**
बी. ए.  भाग १

## शिवाजी राजे



विजेसारखी तलवार चालुन गेला
निधड्या छातीने हिंदुस्तान हालवून गेला.
मूठभर मावळ्यांना घेऊन
हजारो सैतांनाना नाहून गेला
स्वर्गात गेल्यावर देवांनी त्याला
झुकुन मुजरा केला.
असा एक
मर्द मराठा माझा शिवबा होऊन गेला...

**प्रथमेश आडे**
बी. ए. भाग १

## बाबा...



सगळे म्हणती आईची वेडी माया
तरि बाप असतो संपूर्ण कुटुंबाचा
पाया माया बाबाची असतात नारळ
खरे, राग आला जी वर आतुन
प्रेमाचे झरे कुटुंबासाठी बाबा राबतात
दिनरात देह झिजे त्याचा जळ ते
जशी दिव्याची वात ढाल बनुनी
बाप उभा राहिला दारात
हिम्मत ना कोणाची उगाच येण्या
घरात माया बाबांची असते कस्तुरी
परि दिसली नाही वजन जरी
जाणावी ती अंतरी येईल वृद्धपणी
जेव्हा बाबांसाठी व्हा
तुम्ही त्यांच्या आधाराची एक काठी

**कु. वैशाली राठोड**
बी. ए. भाग ३

# नातं लेकीचं....
# जसा खेळ भातुकलीचा



भातुकलीचा खेळ  आता संपत आलाय
माझी छकुली आता राजाराणी चा संसार मांडत आहे ....
काल पर्यंत बाबा बाबा करत घर भर हिंडणारी चिमणी
आज अचानक मोठी झाल्यासारखी वाटत आहे ........
तु परक्या घरी निघून गेली अन्
घरातला चिवचिवाट कायमचाच बंद झाला
तुझ्याशी भांडणारा तुझा दादा एकटाच रडतोय
आता कोण समजवणार तुझ्या भावाला..........
तायडी तायडी करत तुझ्या मागे मागे फिरणारी छोटी
आज एकटीच पडली....
कस गं लाडले भातुकलीचा खेळ  संपवला
आणि रक्ताचं हे  नाते एका क्षणात
परक्या व्यक्ती साठी मोडली..........
अगं तुझ्या आईची काय व्यथा सांगू तिची तर जीव की
प्राण आणि प्रत्येक श्वास ह ोती तू.......
तिच्या जगण्याची आस अन्
स्वर्गाच्या सुखाची आभास होती तू.....
तुझे नखरे पुरवता पुरवता आयुष्य गेले छकुले आज
काळ जावर दगड ठेवून रेशम गाठ दुसऱ्या सोबत बांधून दिली.....
अगं सगळे च रडून मोकळे  होतात पण मी कुणापुढे मांडू
माझी कथा आज वीस वर्षे सांभाळ लेली माझी दिदी एका क्षणात पोरकी झाली......

**कु. प्रणिता चव्हाण**
बी.ए. भाग ३

# जगात भारी १५ फेब्रुवारी



घरमनी याडीचा लेक तो.
बंजारा चा देव होता.
झुकला नाही कोणासमोर
निजामांचा तो बाप होता.
झुक नही सकता में
सेवालाल महाराज का अखंड भाग हू।।
जल दे जो दुश्मन की
रूह तक में वही बंजारा की
औलाद हूँ जय सेवालाल.
सेवालाल महाराज
एक तोंडेर एक नायक
वो तांडेर वू नायक
ऐ तांडेर एक नायक
वो तांडेर वू नायक
पण सारेती मोठो
एकच नायक
सेवालाल नायक
सेवालाल महाराज
मनेम सेवालाल
दिलेंम सेवालाल
आंखीय सेवालाल
जगेम सेवालाल
केरी तू निंदा मत कर
केरी तू ईर्षा मत कर
अच्छे वाटेप चाल तू
ध्येय तू हासील तू कर.

**कु. प्रणोती सौंदडे**
बी. ए. भाग ३

# माझे बाबा

आपल्या जीवनात
आईप्रमाणेच बाबांचे ही महत्त्व खूप आहे
ते कडक, शिस्तप्रिय असले तरी
मनाने प्रेमळ असतात.
ते आपल्या कुटुंबाचा आधार असतात.
कोणतेही संकट आले तरी
आपल्या पाठीमागे ते
खंबीरपणे उभे असतात.

**कु. जयश्री पवार**
बी. ए. भाग २



# आयुष्याची परीक्षा...

माणूस एकदाच
शाळेतल्या परिक्षेत पास होवू शकतो
पण आयुष्याच्या परिक्षेत काय होतील कशी पास करणार ?
ज्या परिक्षेत नेमके प्रश्न कोणते विचारले जातील याचीच पूर्वकल्पना नसते
तर कोणती उत्तरे वाचून ही अवघड परिक्षा पार करणार...
आयुष्याची परिक्षा फार अवघड असते
ज्या परिक्षेत आपल्या खडतर प्रवासाच्या प्रश्नाच्या उत्तराची गुरुकिल्ली ही आपल्यालाच बनवावी लागते....
आयुष्य ही फार अवघड शाळा आहे
आपण कोणत्या वर्गात आहोत हे
आपल्यालाच ठाऊक नसते
पुढची परिक्षा कोणती याची कल्पना नसते
आणि कॉपी करता येत नाही
कारण प्रत्येकाची प्रश्नपत्रिका
वेगवेगळी असते....

**महेश राठोड**
बी. ए. भाग ३

# माझे बाबा

''माझे बाबाचे नाव किशोर आहे.
माझे बाबा एक सर्वसामान्य शेतकरी आहेत.
माझे बाबा दिवस-रात्र खूप कष्ट करतात.
मला कधी-कधी वाटते की माझ्या बाबांना
शेतीच्या कामाला कधी सूट्टी का मिळत नाही.
माझ्या बाबांची एकच इच्छा आहे .
की मी खूप शिकावे.
नोकरीला लागावे मी
स्वत:च्या पायावर उभी रहावे
आणि मी हे माझ्या बाबांचे स्वप्न पूर्ण करणार
व त्यांना आनंदी व सूखी ठेवणार.''

**कु. पल्लवी किशोर राठोड**
बी. ए. भाग ३

# आई वडील



नात्याची दोरी नाजूक असते
डोळ्यातील भाव ही
हृदयाची भाषा असते.
जेव्हा जेव्हा विचारतो
भक्ती व प्रेमाचा अर्थ
तेव्हा एक बोट आईकडे
तर दूसरे बोट वडीलाकडे असते......

**अक्षय जयसिंगपुरे**
बी. ए. भाग १

## पावसाचे पाणी ...



पाऊस येतो
मातीला सुगंध सुटतो
जमीन तो ओली करतो
गारवा नेहमी पसरवत राहतो.
अश्रु तो शेतकऱ्यांचे पुसतो.
सर्वांना आनंदी करतो
सुखाचा सागर देतो.
पाणी देतो वारा देतो.
पावसाची साथ देतो.
शेतकऱ्यांच्या हातात हात देतो.
सोनेरी पहाट सुखाची देतो.
न डगमगता गरजत राहतो.
रिमझिम अवाज करतो.
थंडावा तो पसरवतो.
झाडे सर्व फुलवतो.

**कु. दामिनी राठोड**
बी. ए. भाग १

## माझे गाव

हे गाव आहे माझं
गावात चालते पंचायती राजं
गावात आहे हिरवागार निसर्ग
त्याला पाहुन मन होते दंग
मनाला वाटत व्हावं फुलपाखरू
गावात हिंडावं उडावं भिरुभिरु
पंचायत आहे गावात
भांडण झाल तर जातात पंचायतीत धावत
गावात आहे हिरवंगार रान
मेल तिथं निघत नाही तिथुन मन

**कु. काजल पवार**
बी. ए. भाग १



# नातं तुझं नि माझं...



विश्वासाच नात हे
प्रेम वेलीवरती फुलाव...
हे वा वाटावा साऱ्यांना
नातं अस तुझ नि माझ असाव.....
ध्रुव ताऱ्यांपर नातं हे
आकाशी झळ कावं......
हे वा वाटावा त्या चांदण्याना
नातं अस तुझ नि माझ असाव........
समुद्रापरि सखोल नातं हे
अजूनी खोल होत जाव......
हे वा वाटावा त्या शिंपल्यातील मोत्यांना
नातं अस तुझ नि माझ असाव.....
मोगऱ्याचा कळीपरी नाजूक नातं हे
ह्या नात्यामधून सुगंध दरवळाव.........
हे वा वाटावा ईतर फुलांना
नातं अस तुझ नि माझ असाव......
फुलपाखरापरि नातं हे
बेधुनंद होऊन मनसोक्त बागडाव........
हे वा वाटावा त्या निसर्गाला
नात अस तुझ नि माझ असाव.....

**कु. पूजा पाटील**
बी.ए. भाग ३

## सुविचार

हार उसकी होती है जो
शिकायत हर बार करता है
जीत जाता है वो जो कोशिश बार बार
करता है ...

**कु. तेजस्वीनी मैंद**
बी. ए. भाग ३

# सांगू का आई...



सांगु का आई...
माझा घसा का बसला ?
स्वप्नात किनई मी
बर्फ खुप खाल्ला
बर्फाच्या डोंगरावर
केली झिम्मड मस्ती
आईस्क्रिम आईस्क्रिम
धम्माल नुसती
सांगु का आई...
खरी गोष्ट तुला ?
मी नाही केला.
हा बिछाना ओला
तुझ्यासाठी बर्फ- गोळा
खिशात होता ठेवला
मला वाटतें तोच
इथे वितळून गेला ...

**कु. वैष्णवी भुसारी**
बी. ए. भाग ३

# आई बाबा



माझे सर्वस्व आहात तुम्ही
अस्तित्व माझे आहे तुमच्यामुळे
आयुष्य नावाच्या पुस्तकातील
सोनेरी अध्याय आहात तुम्ही
सर्व सुखाचा झरा तुम्हापासून
नवचैतन्य, नव उमेदीचा उगम तुम्हापासून
अस्तित्व दिसने देवाचे तुमच्यामध्ये
फक्त असावे तुम्हीसोबत बाकी काही नको आयुष्यात...

**कु. गायत्री वानखडे**
बी.ए. भाग २

# शिवबा ...



शिवबा आहे  तितकेच प्रिय
जितकी कि जिजामाता
जिजामात घडली नसती
तर घडले नसते शिवबा
माझ्या मातेला विसरून चालणार नाही
तिने सुद्धा दिली होती
स्वराज्य घडवण्याची ग्वाही
जिजामाता आमची आई
शिवबा आहे  भ्राता
शिवबा आहे  तितकेच प्रिय
जितकी की जिजामाता...

**कु. सानीका चावरे**
बी. ए.  भाग २

# संस्कृती...

शोधावया भाकरीला निघाली
ती भूक आहे .....।।
जन्मताच गरीबी येते
ही कुणाची चूक आहे ....।।
भूक लागली की खाणे
ही प्रकृती आहे ....।।
भूक नसतांना खाणे ही विकृती आहे ....।।
घासातील घास
दुसऱ्याला देणे ही
मराठी माणसाची
संस्कृती आहे ।।

**कु. स्नेहा वाडेकर**
बी. ए.  भाग २

## सुविचार

रात नाही ख्याब बदलते है।
मंजीक नही कारवा बदलता है।
जस्बा रखो जितने का,
क्योंक किस्तम बदले या ना बदले पर
वक्त जरूर बदलता है।

**कु. रविना जाधव**
बी.ए. भाग २

# एक नाते मैत्रीचे ...



एक नाते मैत्रीचे
आपल्या आयुष्याला कमी सुखद कलाटणी
तर कधी वेडेवाकडे वळण देणारे ।
एक मैत्रीचे सुख-दुःखात साथ देणारे
तर कधी अर्ध्या वाटेवर सोडणारे ।
एक नाते मैत्रीचे
चुकलेल्याला योग्य मार्ग दाखवणारे
तर कधी चुकीच्या रस्त्यावर
चालत यायला सांगणारे
एक नाते मैत्रीचे
सूर्यासारखे तेजस्वी प्रकाश देणारे
कधी अंधारात सोडून जाणारे
म्हणूनच मैत्री करावी
सुख-दुःखात साथ देणाऱ्याशी
योग्य मार्ग दाखवणाऱ्याशी
म्हणून मैत्रीचे नाते असावे
फुलकाट्यांच्या जोडीसारखे
नेहमीच कष्टात सुखी राहणारे ...

**कु. राणी जाधव**
बी.ए. भाग - २

## चारोळी

जो आला जन्माला
जाईल सामारो मृत्यूला
हा नियमच नियतीचा
मातीचे धन मिळे मातीला...

**कु. राधा उघडे**
बी. ए. भाग ३

अपयशाच्या दुःखात
रडत बसायचं नसतं ...
तर जिकण्याच्या उमेदीत
पुन्हा लढायचं असतं ...

**कु. राधा उघडे**
बी. ए. भाग ३

## महाविद्यालयात राबविण्यात आलेले विविध उपक्रम



'मेरा माटी मेरा देश' कार्यक्रम



बॅडमिंटन स्पर्धेत सहभागी विद्यार्थी


स्वातंत्र्य दिन समारोह


National Sport Day Celebration 2023



युवा महोत्सव २०२३



मा. माणिकराव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबीर



इतिहास विभागाद्वारा आयोजित नाणे प्रदर्शनी २०२४


अमृत कलश उपक्रम

## महाविद्यालयात राबविण्यात आलेले विविध उपक्रम



निरोप समारंभ २०२४



Workshop on Green Campus


Induction program



दहीहंडी



वार्षिक युवा महोत्सव २०२४



माजी विद्यार्थी मेळावा


University level brilliant posters presentation program


Wallpaper-2023 Diwali celebration wishes by Dept. of Eng. & Marathi

## ग्रंथालय विभागाचे उद्बोधन वर्ग

विदर्भ कल्याण / दारव्हा



## कार्यशाळेतून दिले विद्यार्थ्यांना धडे



## पर्यावरणाचे संतुलन ठेवण्याची जबाबदारी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची : डॉ. रामधन हिरे



## जिजामाता कला महाविद्यालयात जागतिक क्रीडा दिन

विदर्भ कल्याण / दारव्हा



## एड्स व कुष्ठरोग जनजागृती कार्यक्रम संपन्न

प्रतिनिधी / अमरावती दर्शन

यवतमाळ, ९ फेब्रुवारी : स्थानिक नवसंजिवन शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथील समाजशास्त्र विभागाद्वारा एड्स व कुष्ठरोग जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्याकरिता श्रीकृष्ण बहुउद्देशीय विकास मंडळ खडकदरी तालुका पुसद येथील कलाकार लाभले होते. त्यामध्ये देविदास साखरे सुरेश वाघमारे विकास खर्डे गोपाल भारकड अशोक सांडगे कल्पना मस्के शीलाबाई महिंद्रकर पवन साखरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावून जनजागृती केली. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. ए.पी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. पुरुषोत्तम बांडे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. रमेश खंडारे डॉ. रामधन हिरे डॉ. जयवंत जुकरे डॉ. प्रीती ठाकरे डॉ. राजेश गेडाम प्रा.कु. रूपाली कासरे नितेश कदम सचिन भाटोळे विनोद कंडाळे सोमराज लोहकरे सतीश सरतापे तेजस्विनी चव्हाण राणी जाधव अजय चव्हाण महेश वांदोळे महेश चव्हाण प्रेम मनोहर प्रथमेश आडे माधुरी राठोड रवीना चव्हाण रेवती चौधरी सानिका चौरे सुष्टी अगम गायत्री वानखडे अक्षय जयसिंगपूर पायल राऊत पायल चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.



## खेळ व क्रीडा विभागाचे विविध कार्य...

सिंहझेप प्रतिनिधी

यवतमाळ : स्थानिक नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथील खेळ व क्रीडा विभागामार्फत युवा महोत्सव 2024 निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत खो-खो, कबड्डी, हॉलीबॉल, क्रिकेट ...



कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए पी जाधव व डॉ. रमेश खंडारे यांच्या हस्ते करण्यात आले. ...

डॉ. रामधन हिरे डॉ. राजेश गेडाम डॉ. जयवंत जुकरे डॉ. रमेश खंडारे डॉ. पुरुषोत्तम बांडे प्रा. कु. रुपाली कासरे यांची महत्त्वाची भूमिका पार पडली. या कार्यक्रमाचे आयोजन व ...

## आरोग्य तपासणी व मोफत औषध वाटप शिबिर संपन्न

प्रतिनिधी / १३ मे

यवतमाळ : स्थानिक नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा द्वारा संचालित श्रीमती सुमित्राबाई ठाकरे आयुर्वेदिक ... जिजामाता कला ...



## तपोवनेश्वरला इतिहास विभागाची भेट



प्रतिनिधी / अमरावती दर्शन


## आरोग्य तपासणी व मोफत औषध वाटप शिबिर संपन्न

मोलाचे सहकार्य लाभले होते. या कार्यक्रमांतर्गत गावातील व शिबिरातील मिळून एकूण ९६ रुग्णांची तपासणी करण्यात आले. या कार्यक्रमाच्या ... राष्ट्रीय सेवा ...



## महाविद्यालयाचा आत्मा ग्रंथालय

### डॉ.विवेक जगताप यांचे प्रतिपादन



## मतदान जनजागृती रॅली



नगर शिवाजीनगर बस ... चौक आणि गोळीब... तहसील पंचायत समि... आदी भागातून फि... स्थानिक परिसरात ... करण्यात आला.

## जिजामाता कला महाविद्यालयमध्ये निरोप समारंभ संपन्न

नांदेड– नवसंजीन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथील बी.ए.भाग ३ च्या विद्यार्थ्यांना बी.ए.भाग १ व २ च्या विद्यार्थ्यांनी समारोप कार्यक्रमाचे आयोजन केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा डॉ रामधन हिरे अध्यक्षीय भाषणांमधून डॉ हिरे यांनी विद्यार्थ्यांना स्वयंभू होऊन आपल्या आई वडिलांचे नाव मोठे करा असा संदेश दिला.त्या नावाबरोबर आमचे व महाविद्यालयाचे नाव मोठे होईल.त्याचा आम्हाला काही गर्व राहिल यावर मार्गदर्शन करून भाविआयुषाकरीता शुभेच्छा देवून परीक्षेकरीता शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी डॉ रामधन हिरे यांना डीलीट प्राप्त झाल्या बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमाचे संचालन दामिनी ...

## खेळ व क्रीडा विभागाचे विविध कार्यक्रम





जिजाऊची लेक



वृक्षारोपण




बॅडमिंटन स्पर्धेत सहभागी विद्यार्थी सोबत प्रा. राजेश गेडाम



आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत सहभागी विद्यार्थी




मा. माणिकराव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबीर



One day Workshop on NDLI, N-List, AI organized by Library dept




युवा महोत्सव २०२३



Earn and Learn Activity



Equal Opportunity Cell Meeting 2023



लायब्ररी ओरिएंटेशन २०२३-२४



मा. राहुलभाऊ ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मॅरेथॉन स्पर्धा



'मेरी माटी मेरा देश' व वृक्ष संवर्धन



'मेरी माटी मेरा देश' कार्यक्रम



एक तास श्रमदान करताना कर्मचारी वर्ग



Equal Opportunity Cell Meeting



RTE Act awareness programme



राज्यशास्त्र विभाग द्वारा आयोजित वादविवाद स्पर्धा

## आमचे प्रेरणास्थान



**मा. आमदार श्री. माणिकरावजी ठाकरे**

संस्थापक अध्यक्ष, नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा
माजी गृह तथा उर्जा राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
माजी सदस्य विधान परिषद महाराष्ट्र राज्य

